पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड
कार्यालय- चिंचवडगाव बस स्टॉप, व्यापारी संकुल,
पहिला मजला, चिंचवड पुणे ४११०३३
dcptfc@mah.gov.in

जा.क्र./पोउआ/वाह/नियोजन/१२९३५३७/२०२४ दिनांक - २६/०८/२०२४

## वाहतुक नियंत्रण अधिसुचना

पिंपरी-चिंचवड आयुक्तालयाचे हद्दीत दरवर्षी प्रमाणे यावर्षी देखील दिनांक २७/०८/२०२४ रोजी कृष्णजन्माष्टमी निमीत्त विविध खाजगी व सार्वजनिक मंडळांतर्फे दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आलेले आहे. सदर दहीहंडी उत्सवास नागरीकांचादेखील प्रचंड प्रतिसाद मिळत असुन दहीहंडी पाहणेकरीता लोकांची प्रचंड प्रमाणात रस्त्यावर गर्दी होत असल्याने सदर वेळी इतर वाहतूक हि सुरळीत व सुरक्षित होवून गतिमान होणेकरीता वाहतूक बदल करणे आवश्यक असते.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला अधिकार प्राप्त झाले आहेत त्याअर्थी मी बापू बांगर, पोलीस उपायुक्त, वाहतुक शाखा, पिपंरी चिंचवड शहर, यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

### तळवडे वाहतूक विभाग

१) चिखलीवरुन आकुर्डीकडे साने चौक मार्गे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदी करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग :- सदर मार्गावरील वाहने वाघु साने चौकातुन उजवीकडे वळुन अष्टविनायक चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

२) कृष्णानगर भाजी मंडई चौकाकडून साने चौक मार्गे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदी करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग :- सदर मार्गावरील वाहने ही कृष्णानगर चौकातील सर्विस रोडने त्रिवेणीनगर/घरकुल चौक मार्गे चिखलीकडे जातील.

### दिघी आळंदी वाहतूक विभाग

३) चरोली फाटा ते दाभाडे सरकार चौक मार्गे मरकळ/शिक्रापुर कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदी करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग १ :- चरोली फाटा - मँजीक मिठाई स्विट होम डावीकडे वळुन – तनिष ऑर्चिड फेज २ सोसायटी - ग्लोबल हाईटस सोसा - अपेक्स इंटरनँशनल स्कुल – रिवर नेस्ट सोसा समोरुन डावीकडे वळुन पुलावरुन पीसीएस चौक (धानोरे फाटा) मार्गे इच्छित स्थळी जातील.

पर्यायी मार्ग १ :- शिक्रापुर नगर मार्गे येणारी वाहतुक - पीसीएस चौक (धानोरे फाटा) – दाभाडे वस्ती उजवी कडे वळुन रिवर नेस्ट सोसा - अपेक्स इंटरनँशनल - ग्लोबल हाईटस सोसा - तनिष ऑर्चिड फेज २ सोसायटी उजवीकडे वळुन मँजीक मिठाई स्विट होम - चरोली फाटामार्गे इच्छित स्थळी जातील.

### तळेगाव वाहतूक विभाग

४) लिंब फाटा चौकाकडुन तळेगाव स्टेशन चौकाकडे येणारे वाहतुकीस मारुती मंदिर चौक मार्गे जाण्यास मनाई करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग :- सदर मार्गावरील वाहने लिंबफाटा- मारुती मंदिर चौक (डावीकडे वळुन)- राज मेडीकल कार्नर (उजवीकडे वळुन) जिजामाता चौक( डावीकडे वळुन)- खांडगे पेट्रोल पंप - तळेगाव स्टेशनचौक मार्गे पुढे इच्छित स्थळी जातील

५) तळेगाव स्टेशन चौकाकडुन लिंबफाटा चौकाकडे जाणारे वाहतुकीस जिजामाता चौक मार्गे जाण्यास मनाई करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग :- सदर मार्गावरील वाहने तळेगाव स्टेशन चौक- खांडगे पेट्रोल पंप (उजवीकडे वळुन) - बेटी बचाव शिल्प कार्नर( डावीकडे वळुन) राज मेडीकल कार्नर (उजवीकडे वळुन)- मारुती मंदिर चौक

(उजवीकडे वळुन) - लिंबफाटा मार्गे पुढे इच्छित स्थळी जातील.

**भोसरी वाहतूक विभाग**

६) पुणे नाशिक महामार्गावरील बाबर पेट्रोल पंप चौकाकडून जायका चहा या दुकानाजवळून भोसरी ओव्हर ब्रिजचे खाली जाणाऱ्या वाहनांना जायका चहा दुकान या ठिकाणी दुचाकी वगळून इतर सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदी करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग :- सदर मार्गावरील वाहने भोसरी ओव्हर ब्रिज मार्गे पुढे धावडेवस्तीकडे जावून सद्‌गुरुनगर चौकातुन यु टर्न मारुन भोसरी ब्रिज खाली येवून दिघी-आळंदी मार्गे इच्छितस्थळी जातील.

**निगडी वाहतूक विभाग**

७) डॉ.बाबासाहेब आबेडकर चौक बंटी ग्रुप, मेन रोड आकुर्डी या ठिकाणी येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंद करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग १. :- खंडोबा माळ चौकातुन उजवीबाजुकडें डॉ.बाबासाहेब आबेडकर चौक भाजी मंडईकडे चौकाकडे न जाता ती सरळ म्हाळसाकांत चौकाकडे इच्छित स्थळी जाईल.

पर्यायी मार्ग २. :- आकुर्डी गावठाणाकडुन येणारी वाहतुक डॉ.बाबासाहेब आबेडकर चौक भाजी मंडईकडे चौकाकडे न जाता ती उजवीकडे वळुन म्हाळसाकांत चौकाकडे इच्छित स्थळी जाईल.

पर्यायी मार्ग ३. :- म्हाळसाकांत चौकाकडुन येणारी वाहतुक डॉ.बाबासाहेब आबेडकर चौक भाजी मंडईकडे चौकाकडे न जाता ती सरळ खंडोबामाळ चौकाकडे इच्छित स्थळी जाईल.

८) लालबहादुर शास्त्री चौक (काचघर चौक)से.नं. २५ प्राधीकरण निगडी येथे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहतुकीस प्रवेश बंद करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग १. :- भक्तीशक्ती ब्रिज वरुन येणारी वाहतुक काचघर चौकात न येवु देता ती सरळ अप्पुघर मार्गे इच्छीत स्थळी जातील.

पर्यायी मार्ग २. :- भेळ चौकाकडुन येणारी वाहतुक काचघर चौकात न येवु देता गांधी हॉस्पीटल मार्गे व बिग इंडीया चौक मार्गे इच्छीत स्थळी जातील

तरी वरील प्रमाणे दिनांक २७/०८/२०२४ रोजी १५.०० ते २३.०० वाजे पावेतो आवश्यकतेनुसार वाहतुकीत बदल करण्यात येत असून नागरीकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा.

( बापू बांगर)
पोलीस उप-आयुक्त,
वाहतूक शाखा,पिंपरी चिंचवड

**प्रति,**

जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

**प्रत :**

१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर

२) पोलीस निरीक्षक, तथा जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.
/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

३) प्रभारी अधिकारी **तळवडे, तळेगाव, दिघी आळंदी, भोसरी,निगडी** वाहतुक विभाग, पिंपरी चिंचवड
२/- अधिसुचनेचे अनुषंगाने योग्य असे बॅरीकेटींक करुन वाहनचालकांना मार्गदर्शन करणारे फलक लावावे.